# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :- २२ डिसेंबर २०२३

---------------------------------------------------------------------------------------------------------------

जळगाव. दि.२२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील गणितशास्त्र प्रशाळेत प्रा. एच.एस.रामाने यांचे व्याख्यान व विविध कायक्रम आयोजित करुन राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला.

धारवाड विद्यापीठातील प्रा. एच. एस. रामाने यांनी गणिताची उपयोगिता या विषयावर दृकश्राव्य माध्यमातून ऑनलाईन व्याख्यान दिले. त्यांनी गणिताचे जीवनातील महत्व आणि फायदे सोप्या भाषेत समजावून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणित विभाग प्रमुख प्रा. किशोर पवार यांनी केले. प्रशाळेचे संचालक प्रा.एस.आर. चौधरी यांनी रामानुजन यांचा जीवन परिचय करून दिला. पाहुण्यांचा परिचय आणि सूत्रसंचालन डॉ. सी.टी. आगे यांनी केले.

सकाळ सत्रात गणितशास्त्र प्रशाळेत प्रसिध्द गणितज्ज्ञ रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्याप्रसंगी प्रशाळेतील संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आर. एल. शिंदे, प्रशाळेतील डॉ. एच.एल. तिडके, डॉ मनोज पाटील, डॉ रोहन कोष्टी, उन्नती सोनावणे, संशोधक विद्यार्थी आणि कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

राष्ट्रीय गणित दिवसानिमित्त विभागातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या गावातील शाळेत / महाविद्यालयात गणित विषयाचे महत्त्व आणि गणितज्ज्ञ रामानुजन यांच्या बद्दल माहिती देऊन एक आगळया वेगळया पद्धतीने गणित दिवस साजरा केला. या उपक्रमात विभागातील ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

---------------------------------------------------------------------------------------------------------------

-- प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता